# प्रेसनोट

जा.क्र. २०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०४/२०१८

## " पोलीस अधीक्षक विनीता साहु यांचेकडुन सर्वसामान्य जनतेकरीता फिरते **S.P** कॅम्प " या योजनेचे अनावरण

भंडारा:– दिनांक १९/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा श्रीमती विनीता साहु पोलीस अधीक्षक यांच्या संकल्पनेतुन भंडारा जिल्हयातील सर्वसामान्य जनते करीता" फिरते **S.P** कॅम्प " ही नाविन्यपुर्ण संकल्पना तयार करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आज दि. १९/०४/२०१८ रोजी भंडारा शहर पोलीस ठाणे अंतर्गत बहिरंगेश्वर मंदीर खाम तलाव चौक, भंडारा येथे विनीता साहु पोलीस अधीक्षक यांच्ये हस्ते फिरते **S.P** कॅम्प योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

सदर उदघाटन प्रंसगी मा. रामचंद्र अवसरे पवनी आमदार, सुनील मेंढे नगरपरीषद अध्यक्ष, झंवर, सारडा, बहिरंगेश्वर मंदीर चरिस्टर अध्यक्ष, रश्मि नांदेडकर अपर पोलीस अधिक्षक, कुलकर्णी पोलीस उपअधिक्षक (गृह), श्री. जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक मानकर पो.ठाणे चे ठानेदार, घुसर स्थागुशा पोलीस निरीक्षक, जिल्हयातील पोलीस अधीकारी व कर्मचारी व परीसरातील नगर सेवक, नगर सेवीका व परीसरातील नागरीक मोठया संख्येने हजर होते.

भंडारा जिल्हा येथे आपले पहीले फिरते **s.p** कॅम्पला उपस्थित सर्वांचे आभार मानले. भंडारा शहरातील जनतेचे कायदा व सुव्यवस्था संबंधातील प्रश्न सोडविण्याचा उद्देशाने आयोजीत उपक्रमात विनीता साहु यांनी फिरते पोलीस स्टेशन जिल्हयात राबविण्यात येत आहे. बरेच लोकांना वेगवेगळया गावातुन भंडाऱ्याला यावे लागतात. त्यांचा तेवढा वेळ जातो, त्यादृष्टीने गावातच **s.p** ऑफीस घेवुन जावुन त्याचा तेथेच तक्रारीचे निवारण करण्यात येणार अशी सुविधा नागरीका करीता करण्याचा आमचा मानस आहे.

मा. नगर अध्यक्ष सुनील मेंढे यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, फिरते पोलीस स्टेशन त्याचप्रमाणे **s.p** कॅम्प हा उपक्रम तयार केला आहे. तो चांगला उपक्रम वाटला. भंडारा शहरात ड्रक्सचे प्रमाण वाढलेले आहे. लहान मुले यांच्या आहारी जातात. भंडारा शहरात ट्रॉफीक सिंग्नल तयार करुन तसेच रोड रुंदीकरण तसेच भंडारा शहरात सिसीटीव्ही कॅमेरे भंडारा शहरात लावण्यात येईल.

त्याचप्रमाणे मा. रामचंद्र अवसरे, अभय बन्सोड लोककलावंत, रामदास शहारे, शालीकराम झंझाड, विजय क्षिरसागर यांनी सर्वांनी समस्या माडून त्याचे निराकरण विनीता साहु यांनी केले व निराकरण करणार असे सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेवानिवृत्त लियाकत अली खान तसेच आभार प्रदर्शन कुलकर्णी पोलीस उपअधिक्षक (गृह) यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.